**ISSN: 2583-6285** ***Volume 4, Issue 1; Feb 2025***

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCH AND ANALYSIS IN COMMERCE AND MANAGEMENT

IJRACM

Web: https://www.iarj.in/index.php/ijracm/issue/archive

# 2. भोई समाजाविषयी विविध अभ्यासकांनी केलेल्या अभ्यासाचा संक्षिप्त आढावा

**प्रा.डॉ. रामा संभाजी वानखेडे,**

**शितल तुकाराम सोनवणे**

*डी.डी.एस.पी. महाविद्यालय एरंडोल*

*जि. जळगाव.*

***गोषवारा:***

*भोई जमात ही भारतातील एक भटकी जमात असून ती विशेषतः महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर आढळते. या संशोधन प्रबंधात उपलब्ध अप्रकाशित पीएचडी प्रबंध, संशोधन लेख, पुस्तके व इतर संदर्भ ग्रंथांचा आधार घेत भोई समाजाच्या सामाजिक, आर्थिक, व सांस्कृतिक स्थितीचा संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या संशोधनातून भोई समाजाच्या पारंपरिक व्यवसाय, जीवनशैली, आणि शासनाच्या योजनांचा प्रभाव यांचा सखोल अभ्यास मांडण्यात आला आहे. याचा उद्देश भोई समाजाच्या अडचणी, आव्हाने, व त्यांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी उपाय सुचविणे हा आहे.*

***सूचक शब्द:***

भोई जमात, जीवनशैली, भटकी जमात,  महिला सशक्तीकरण.

## 1.1 प्रस्तावना:

भारतात अनेक जाती- धर्मांचे लोक आहेत. त्यात विविध जाती व उपजातींचा समावेश आहे. या विविध जाती त्यांच्या रूढी परंपरा, व्यवसाय यानुसार विविध क्षेत्रात वास्तव्य करताना दिसून येतात. त्यातील एक जमात म्हणजे भोई जमात. भारताच्या विविध

भागात ही जमात विविध नावांनी ओळखली जाते त्यातच महाराष्ट्रात तिच्या 26 उपजाती आहे. उत्तरेकडील राज्यात ही जमात एक आदिवासी जमात म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्रात मात्र भोई जमात भटक्या जमातीतील 'ब' संवर्गात मोडते. भोई समाज हा भारतातील एक महत्त्वाचा पण तुलनेने अल्पसंख्याक आणि दुर्लक्षित समाजघटक आहे. त्यांच्या ऐतिहासिक, सामाजिक, आणि सांस्कृतिक परंपरांचा अभ्यास करताना असे दिसून येते की, त्यांनी विविध क्षेत्रांत लक्षणीय योगदान दिले असले, तरी त्यांच्या जीवनशैली, परंपरा आणि सामाजिक स्थितीविषयी पुरेसा अभ्यास अद्याप झालेला नाही. भोई समाज प्रामुख्याने जलसंपत्तीशी निगडित व्यवसाय, मासेमारी, व जलवाहतुकीसाठी ओळखला जातो, मात्र आधुनिक काळात या व्यवसायावर तंत्रज्ञान व आधुनिक अर्थव्यवस्थेचा प्रभाव पडला आहे. विविध अभ्यासकांनी भोई समाजाच्या इतिहास, संस्कृती, आणि समस्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु या अभ्यासांमध्ये एकसंधता किंवा सुसूत्रता आढळत नाही. त्यामुळे त्यांच्या अभ्यासांचा संक्षिप्त आढावा घेऊन एकत्रित व विश्लेषणात्मक चित्र मांडण्याची गरज भासते.

या संशोधनाचा उद्देश भोई समाजावरील विविध अभ्यासांचा समग्र आढावा घेणे आहे, ज्यामुळे त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, व सांस्कृतिक अवस्थेबद्दल सखोल माहिती उपलब्ध होईल.

तसेच या अभ्यासांतील विरोधाभास व साम्य शोधून त्यांचा सुसंगत आधारभूत दस्तावेज तयार करण्याचा प्रयत्न केला जाईल. यामुळे फक्त भोई समाजाच्या समस्यांचे आकलन होणार नाही, तर त्यांच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजनांची दिशाही सुचवता येईल. हा संशोधनात्मक अभ्यास फक्त भोई समाजासाठीच नाही, तर इतर दुर्लक्षित समाजघटकांसाठीही प्रेरणादायी ठरेल.

### 1.2 संशोधनाचा उद्देश:

१. भोई समाजाविषयक संदर्भ साहित्याचा अभ्यास करणे.
२. विविध अभ्यासकांनी भोई समाजावर केलेल्या संशोधनाचे संकलन करून, त्यातील साम्य व विरोधाभास शोधणे.
३. भोई समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांची ओळख पटवून त्यावर उपाय सुचवणे.

४. भोई समाजाच्या पुढील अभ्यासासाठी नवनवीन विषय आणि प्रश्न उभे करण्याची प्रेरणा देणे

**1.3 भोई समाजावर असलेल्या संदर्भ साहित्याचा आढावा:**

भोई समाजाविषयी संशोधन करीत असताना अगोदर त्या विषयाशी संलग्न अभ्यासकांनी केलेल्या संशोधनाचा अभ्यास पुढील प्रमाणे केलेला आहे.

**1. कुकडे सुनीता जगन्नाथराव (2021):**

यांच्या ' भोई जमातीतील महिलांचे सशक्तीकरण एक समाजशास्त्रीय अभ्यास (विषय संदर्भ - परभणी जिल्हा) या संशोधनाचा मुख्य उद्देश भोई समाजातील महिलांचे सशक्तीकरण हा असून समाजातील स्त्रियांचे स्थान, त्यांच्या समस्या, समाजात मिळणारे स्थान, कौटुंबिक स्थान त्यांची भूमिका आर्थिक व सामाजिक दर्जा तसेच रूढी रीतीरिवाज, स्थलांतरित जीवनशैली यांचा सखोल अभ्यास करण्यात आलेला आहे. तसेच महिलांसाठी असलेल्या शासनाच्या विविध योजनांचा या जमातीवरील परिणाम तपासून उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

भोई समाजाच्या आर्थिक व सामाजिक संशोधनासाठी या अभ्यासाचा उपयोग होऊ शकतो. पारंपरिक व्यवसायात स्त्रियांचे योगदान, महिलांचे सशक्तिकरण, महिलांचे स्थान तसेच शासनाच्या विविध योजना व नवीन संधी निर्माण करण्यासाठी या संशोधनातील दृष्टिकोन भोई समाजासाठी दिशादर्शक ठरू शकतो.

**2. Trusha kumbha Rana (2022) Sociological Study Bhoi caste of Saurashtra:**

या संशोधनाचा मुख्य उद्देश गुजरात मधील भोई जमातीच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन करणे हा आहे. भोई समाजाच्या धार्मिक व सांस्कृतिक जीवनशैली, सामाजिक, आर्थिक व राजकीय व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास संशोधकांनी केला आहे. त्यांच्या सामाजिक समस्या, त्यांची व्यवसायिक जीवनशैली त्यांचे उत्पन्न, राजकीय स्थान तसेच शैक्षणिक प्रगती यांचा विश्लेषणात्मक आढावा घेतला आहे. भोई समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक संशोधनासाठी या अभ्यासाचा उपयोग होऊ शकतो. भोईंच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक समस्यांचे विश्लेषण व

त्यावरील परिणाम आणि उपयोजना हे भोई समाजाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.

**3. खरात दिनेश उत्तमराव (2018):**

यांच्या "खानदेशातील भटक्या जमातींचा समाजशास्त्रीय अभ्यास" या संशोधनाचा मुख्य उद्देश खानदेशातील भटक्या जमातींच्या ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्थितीचा आढावा घेणे हा आहे. या अभ्यासात भटक्या जमातींचा पारंपरिक जीवनक्रम, स्थलांतरित जीवनशैली, आणि त्यांच्यावर लादलेले सामाजिक कलंक यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. तसेच, त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा मागोवा घेत व्यवसायिक जीवनशैली, उत्पन्नाचे स्रोत, आणि शिक्षण व आरोग्यासंबंधी आव्हाने यांचा विश्लेषणात्मक आढावा घेतला आहे. शासनाच्या विविध योजनांचा या जमातींवरील परिणाम तपासून, त्यांच्यासाठी आणखी परिणामकारक उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

भोई समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक संशोधनासाठी या अभ्यासाचा उपयोग भरपूर प्रमाणात होऊ शकतो. भटक्या जमातींच्या समस्यांचे विश्लेषण भोई समाजाच्या आर्थिक मागासलेपणा, रोजगाराच्या मर्यादा, आणि सामाजिक प्रतिष्ठेवरील आव्हाने यावर प्रकाश टाकते. विशेषतः, शासनाच्या योजनांचा उपयोग व प्रभाव यावर आधारित धोरणात्मक मार्गदर्शन भोई समाजाच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरू शकते. सामाजिक सशक्तीकरण, महिलांचे स्थान, आणि पारंपरिक व्यवसायांना आधुनिकतेशी जोडून उपजीविकेच्या नव्या संधी निर्माण करण्यासाठी या संशोधनातील दृष्टिकोन भोई समाजासाठी दिशादर्शक ठरू शकतो.

**4. राठोड अनंत श्रीराम (2023):**

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाद्वारे राबविल्या जाणाऱ्या योजनांचा परिणामांचा चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ - वाशिम जिल्हा) या संशोधनाचा मुख्य उद्देश भटक्या जमातीसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजना व त्या योजनेच्या परिणामांचा अभ्यास करणे आहे.

भोई ही एक भटकी जमात असून या संशोधनाच्या माध्यमातून भोई समाजासाठी असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यास सुलभ होईल. समाजाला शासनाच्या योजनांची माहिती देता येईल. भटक्या जमातीसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची व नवीन संधी या दृष्टिकोनातून या संशोधनाचा उपयोग महत्वपूर्ण ठरवू शकतो.

**5. प्रा.डॉ. वाढे रामनाथ (2016):**

" कहार आणि त्यांचे लोकसाहित्य" या पुस्तकात प्रा. वाढे यांनी कहार भोईंच्या जीवनशैलीचे वर्णन केले आहे. कहार ही भोईंची उपजात आहे. या पुस्तकात कहार भोईंची संस्कृती, त्यांचे आचार विचार, विधी त्यांची वेशभूषा राहणीमान, व्यवसाय, त्यांची लोकगीते यांचा अभ्यास लेखकाने अगदी समर्पक शब्दात मांडला आहे. भोई समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी हे पुस्तक संशोधनासाठी उपयुक्त ठरते. कारण या पुस्तकाच्या माध्यमातून भोई जमातीच्या ऐतिहासिक स्थिती व लोकजीवनाचा अभ्यास करण्यासाठी यातील संदर्भ उपयुक्त ठरतात. या पुस्तकातून भोई समाजातील विविध उपजातींचा अभ्यास करण्यास उपयुक्त ठरते.

**6. इच्छे संतोष (2005):**

' भोईराज महिमा ' या पुस्तकात त्यांनी त्रेतायुगापासून ते मराठेशाहीच्या काळापर्यंतच्या भोई समाजाच्या उत्पत्तीचा इतिहास समाजासमोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. रामायण व महाभारत या महाकव्यात व भोयांचा उल्लेख त्यांनी विस्तृत शब्दात मांडला आहे. राजे महाराजांच्या काळात पालखी वाहून नेणारे भोईंचे योगदान देखील या पुस्तकात लेखकाने मांडले आहे. भोई समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी समाजाचा इतिहास जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यामुळे संशोधनासाठी हे पुस्तक अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**7. प्रा. चव्हाण रामनाथ (2008):**

' भटक्या व विमुक्तांची जातपंचायत ' खंड-4 या पुस्तकात भटक्या जमातीतील विविध जातींच्या विस्तृत स्वरूपात उल्लेख केलेला आहे. ज्यात भोई ही एक भटकी

जमात असून ती करीत असलेल्या पारंपारिक व्यवसाय, रितीरिवाज, विवाह पद्धती यांच थोडक्यात वर्णन केलेले आहे यात लेखकाने परदेशी भोईंची उपजात आहे. जी प्रामुख्याने विदर्भात आढळते त्या भोयांची ओळख करून दिली आहे.

भोई समाजाचे सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी हे पुस्तक अत्यंत उपयुक्त आहे. भोई समाज आजही एका ठिकाणी स्थिर न झाल्याने शाळेपासून दूर राहिला. त्याची ही वृत्ती त्याच्या असुरक्षेतील भावनेतून निर्माण झालेली आहे. दारिद्रता, राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी दिशादर्शक आहे.

**8. डॉ. दूधपचारे योगेश (2018):**

" भोई - समाज - इतिहास व आरक्षणाची दिशा " या पुस्तकात लेखकाने भोई जमातीच्या इतिहास व समाजासाठीचे आरक्षणाचे ज्वलंत मुद्दे व त्यांच्या समस्या तसेच संपूर्ण देशभरात भोई जमातीची ओळख लेखकाने समर्पक शब्दात मांडली आहे. SC ची सवलत समाजाला मिळवून देण्यासाठी समाजाला एकत्रित येणे गरजेचे आहे. त्यासाठी महत्त्वाचे मुद्दे त्यांनी पुस्तकात मांडले आहे.

भोई समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी या पुस्तकाचा उपयोग होऊ शकतो. कारण समाजातील वंचित घटक त्यांच्या समस्या तसेच आरक्षणाचा लाभ व संघटित समाज, शासनाच्या योजना या दृष्टीने हे पुस्तक उपयुक्त ठरते.

**9. सत्यम शिंगाणे (2017):**

"भोईराज एक उपेक्षित इतिहास" या पुस्तकात लेखकाने भोई समाजाचा इतिहास जनसामान्यांपर्यंत आणावा यासाठी छोटेखाणी प्रयत्न केलेला आहे.

भोई समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करण्यासाठी समाजाचा इतिहास जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. इतिहासात भोई समाजाची सामाजिक आर्थिक स्थितीचा आढावा घेऊन सद्यस्थितीचा समाजाच्या परिस्थितीचा आढावा घेण्यास हे पुस्तक उपयुक्त ठरते.

**10.आत्रे त्रिंबक नारायण (2018):**

" गावगाडा " या पुस्तकात लेखकाने ग्रामीण अर्थव्यवस्थेचा अत्यंत सखोल अभ्यास केला आहे त्यांनी मांडलेल्या समस्या व त्यांचे विचार त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित आहे. समाजातील विविध घटकांचे दर्शन व त्यांचे व्यवसाय या गावगाडाच्या माध्यमातून भोई समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करण्यासाठी हे पुस्तक मार्गदर्शक ठरते. गावगाडा या पुस्तकात बलुतेदारांसह विविध जाती - जमातींचा परिचय त्यांनी करून दिला असून समाजशास्त्रीय अभ्यासाच्या दृष्टीने हे पुस्तक भोई समाजाच्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरते.

**11.प्रा. खेडकर अनिता एम. (2008):**

यांनी " खानदेशातील भोई जमातीच्या सामाजिक आर्थिक व व्यावसायिक समस्या आणि त्यांच्या विकासात्मक घटकांचे समाजकार्य दृष्टिकोनातून अध्ययन " विशेष संदर्भ - जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हा या शोधनिबंधातून खानदेशातील भोई जमातीच्या सामाजिक, आर्थिक समस्या, स्त्रियांचे योगदान तसेच राजकीय व ऐतिहासिक पार्श्वभूमी या दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे.

सदर लेख हा भोई समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अध्ययन करण्यास उपयुक्त ठरते. पारंपारिक व्यवसाय व तंत्रज्ञानातील बदलामुळे व्यवसायावर होणारा परिणाम तसेच शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक समस्यांचा अभ्यास करण्यासाठी सदर लेख उपयुक्त ठरतो.

संशोधन पद्धती: - सदर संशोधन लेखनासाठी दुय्यम साधन सामग्रीचा अभ्यास केला असून त्यासाठी विविध अभ्यासकांनी केलेल्या संशोधनाचा आढावा घेण्यात आला आहे.

**1.4 निष्कर्ष:**

वरील संदर्भीय साहित्यामध्ये भोई समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थितीचे सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. पारंपरिक व्यवसाय, स्त्रियांचे योगदान, आणि शासनाच्या योजनांचा प्रभाव या बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. भोई समाजात पोटजातींचे स्वतंत्र अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न

आणि अंधश्रद्धांचा प्रभाव दिसून येतो. त्यांच्या पारंपरिक व्यवसायांत स्त्री-पुरुष समानता दिसत असली, तरी समाज अनेक योजनांपासून वंचित आहे. याशिवाय, पारंपरिक व्यवसायांवर तंत्रज्ञान व आधुनिकतेच्या प्रभावाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. या संशोधनातून भोई समाजाच्या समस्यांचा व्यापक आढावा घेत, त्यांच्यावर उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

या संशोधनाचा आधार पुढील संशोधनाला विविध दृष्टिकोन उपलब्ध करून देतो. भोई समाजाच्या सांस्कृतिक व आर्थिक स्थितीवर अधिक सखोल अभ्यास करण्यासाठी येथे दिलेले संदर्भ महत्त्वाचे ठरतील. विशेषतः, महिलांचे सशक्तीकरण, भटक्या जमातींच्या समस्या, आणि पारंपरिक व्यवसायांचे आधुनिकीकरण यांसारख्या विषयांवर अधिक संशोधन करता येईल. याशिवाय, शासनाच्या योजनांचा प्रभाव, त्या योजनांमध्ये असलेल्या अडचणी, आणि समाजाला अधिक समृद्ध करण्याच्या धोरणात्मक उपाययोजनांची दिशा मिळू शकेल. हा संशोधन लेख समाजाच्या विकासासाठी दिशादर्शक ठरण्यासोबतच भोई समाजाच्या गरजा आणि समस्यांबाबत व्यापक जागृती निर्माण करू शकतो.

## 1.5 संदर्भ सूची:

1. कुकडे सुनीता जगन्नाथराव (2021) 'भोई जमातीतील महिलांचे सशक्तिकरण एक समाजशास्त्रीय अभ्यास' (विशेष संदर्भ-परभणी जिल्ह) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ.
2. Trusha kumbha Rana (2022) Sociological Study Bhoi caste of Saurashtra. Rai University Ahmedabad, Gujarat.
3. खरात दिनेश उत्तमराव (2018) 'खानदेशातील भटक्या जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास.' कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महराष्ट्र, जळगाव
4. राठोड अनंत श्रीराम (2023) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाद्वारे राबविल्या जाणाऱ्या योजनांच्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास. विशेष संदर्भ- वाशिम जिल्हा. सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे
5. प्रा. डॉ. वाढे रामनाथ (2016) - कहार आणि त्यांचे लोकसाहित्य. - स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद
6. इच्छे संतोष (2005):- भोईराज महिमा.

7. प्रा. चव्हाण रामनाथ 'भटक्या विमुक्तांची जात पंचायत खंड- 4' पहिली आवृत्ती (2008) देशमुख अँड कंपनी पब्लिशरर्स प्रा. लि. पुणे
8. डॉ. दूधपचारे योगेश (2018) - भोई समाज: - इतिहास व आरक्षणाची दिशा. - संघर्ष वाहिनी प्रकाशन, नागपूर.
9. सत्यम शिंगाणे (2017) - भोईराज एक उपेक्षित इतिहास.
10. आत्रे त्रिबक नारायण (2018) - गावगाडा - सरिता प्रकाशन पुणे.
11. प्रा. खेडकर अनिता एम. (2008)- "खानदेशातील भोई जमातीच्या सामाजिक, आर्थिक व व्यावसायिक समस्या आणि त्यांच्या विकासात्मक घटकांचे समाजकार्य दृष्टिकोनातून अध्ययन" विशेष संदर्भ: - जळगाव, धुळे आणि नंदुरबार जिल्हा, संशोधनाची रूपरेषा.